28 DEC 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेटच्या बैठकीत अधिविभागातील घटत चाललेल्या विद्यार्थीसंख्येवर गंभीर चर्चा

## सदस्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले; प्रश्नोत्तराच्या तासात ३५ पैकी ५ प्रश्न

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा (सिनेट) बैठकीत प्रश्नोत्तराच्या तासात ३५ पैकी ५ प्रश्नांवर चर्चा झाली. खेळाडूंचा ट्रॅकसूट, विद्यापीठ अधिविभागातील घटत चाललेली विद्यार्थी संख्या, स्पर्धेत खेळाडूंना विलंबाने दिले जाणारे प्रमाणपत्र यावर सदस्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. प्रशासनाच्या उत्तराने सदस्यांचे समाधान झाले नसल्याने गोंधळातच प्रश्नोत्तराचा तास संपला.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा गुरुवारी झाली. दुपारी १२ ते १ यावेळेत प्रश्नोत्तराचा तास झाला. श्वेता परूळेकर यांनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धांना



शिवाजी विद्यापीठातून

जाणाऱ्या खेळाडूंचे तिकीट दोन दिवस आदी कन्फर्म करावे. खेळाडूंच्या ट्रॅकसूटचा बदललेला रंग व खेळाडूंना त्वरित सहभागी प्रमाणपत्र मिळावे, आदी प्रश्न उपस्थित केले. अखेर सभागृहात दोन्ही ट्रॅकसूट सदस्यांना दाखविण्यात आले. अभिषेक मिठारी यांनी विद्यापीठातील अधिविभागांमधील विद्यार्थी संख्येत घट होतेय याचा निषेध करीत विद्यापीठाने दिलेले उत्तर ही चेष्टा असल्याचे मत व्यक्त केले.

विद्यापीठातील टी-२ विभागाबद्दल प्राप्त लेखी व तोंडी तक्रारींवर कार्यवाही केली नसल्याचे मिठारी यांनी सांगितले. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने घ्यावे, अशी सूचना काही सदस्यांनी केली. चालू वर्षीही अधिविभागात प्रवेश कमी झाल्याचे डॉ. व्ही. एम. पाटील यांनी निदर्शनास आणून दिले.

प्रश्नोत्तराच्या तासात सदस्यांनी प्रशासनावर उपप्रश्नांची सरबत्ती केली. यावर कुलगुरूंनी याबाबतची खातरजमा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

28 DEC 2024

**तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेतील वादळी चर्चेनंतर १७ ठराव मंजूर

## विद्यापीठात ७७ पैकी १७ ठराव मंजूर, तर ६० ठराव घेतले मागे

- महाविद्यालयाकडून बनावट पावत्यांनी विद्यापीठाची कोट्यवधीची फसवणूक
- यासंदर्भात निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशीची मागणी
- खेळाडूंच्या दैनंदिन भत्त्यात वाढ ठराव मंजूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिसभेत ७७ ठराव मांडण्यात आले. डॉ. निवासराव वरेकर यांनी मांडलेल्या ठरावात विद्यापीठाच्या देय बनावट पावत्या सादर करून विद्यापीठाची फसवणूक करणाऱ्या संलग्नित महाविद्यालयाची निवृत्त न्यायालयामार्फत चौकशी करा, अशी मागणी केली. एका संलग्नित महाविद्यालयाने बनावट पावत्या दाखवून कोट्यवधीची फसवणूक केली. यासह अन्य ठरावांवरील चर्चेदरम्यान प्रश्न विचारून अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. वादळी चर्चेनंतर ७७ पैकी १७ ठराव मंजूर झाले. तर ६० ठराव मागे घेण्यात आले. सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

शिवाजी विद्यापीठांतर्गत एका महाविद्यालयाने खोट्या पावत्या सादर करून कोट्यवधीची फसवणूक केली. अशी किती महाविद्यालय असून किती कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे,



असा प्रश्न विचारून विद्यापीठ प्रशासनाला अधिसभा सदस्यांनी घाम फोडला. आईस हॉकीची स्पर्धा घेण्याचे नियोजित केले. परंतू या क्रीडा प्रकारात कोल्हापुरातील खेळाडू नसताना ही स्पर्धा कोणासाठी घेतली आहे, असा जाब श्वेता परुळेकर यांनी प्रशासनाला विचारला. डॉ. ज्ञानदेव काळे यांनी मांडलेल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व अधिविभाग व महाविद्यालयांमध्ये २०१८ ची युजीसीची नियमावली जशीच्या तशी लागू करावी. या ठरावावर मतदान घेऊन ठराव मंजूर केला. चर्चेनंतर ठराव मंजूर, नामंजूर की मागे घ्यायचा हे ठरवले. बहुतांश ठरावावर येथे वादावादी झाली. महाविद्यालयाच्या संलग्निकरणाच्या फीमध्ये दर तीन वर्षांनी २० टक्के वाढ होते. ही दरवाढ सहा वर्षांनी २० टक्के करावी, असा ठराव डॉ. मंजिरी मोरे यांनी मांडताच बराचवेळ चर्चा झाली. काही ठराव गतवर्षीचे किंवा किरकोळ चुका असल्यावरून मागे घ्यावे लागले. सदस्य व प्रशासनामध्ये शाब्दिक चकमक झाली. डॉ. माधुरी सावंत, श्रीनिवास गायकवाड, डॉ. मनोजकुमार पाटील, डॉ. प्रकाश कुंभार, मंजिरी मोरे, डॉ. शशिभूषण महाडिक, डॉ. निवासराव वरेकर, श्वेता परुळेकर, संजय परमणे, ज्ञानदेव काळे आदींनी ठराव मांडले. विद्यार्थी हिताचे ठराव मंजूर केले. सकाळी १० वाजता सुरू झालेली अधिसभा रात्री १०-१५ वाजता संपली. म्हणजे अधिसभा तब्बल सव्वा बारा तास सुरू होती. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विभागीय उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक डॉ. धनराज नाकाडे प्रमुख उपस्थित होते. तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे सचिवपदी होते.

### मान्य झालेले काही ठराव

एका प्राध्यापकाला किती प्रश्नपत्रिका काढण्यास सांगाव्या त्याचा आकडा ठरवा. महाविद्यालयाच्या प्रवेश पत्रिकेत विद्यापीठांच्या योजनांचा समावेश करावा. स्पोर्टस कॉम्प्लेक्ससंदर्भात राज्य व केंद्र सरकारशी पाठपुरावा करावा. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याच्या चहू बाजूंनी प्रकाश झोत टाकावा. नवीन शैक्षणिक धोरणासाठी नेमलेल्या कुलकर्णी समितीच्या शिफारशीनुसार विविध विषयांच्या तुकडीमधील विद्यार्थी संख्या निश्चित करा. यासह अन्य महत्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.

28 DEC 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समितीची नियुक्ती करून ताळेबंदातील त्रुटी काढणार

## अधिसभेच्या बैठकीत वादळी चर्चा : त्रुटी ठेवणाऱ्यांवर कारवाई : कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ चा वार्षिक ताळेबंद अहवाल प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी शुक्रवारी सादर केला. मात्र, या अहवालावर लेखापरीक्षकांनी ताशेरे ओढले असल्याने अधिसभा सदस्यांनी याला जोरदार आक्षेप घेतला. अखेर दोन तासांच्या वादळी चर्चेनंतर त्रुटी व सूचनांच्या पूर्ततेसह वार्षिक ताळेबंद अहवाल एकमताने मंजूर करण्यात आला. अधिसभेचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी याबाबत समिती नियुक्त करून पुढील आठवड्यापासून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. निवडणुकीच्या कामाला लोक गेल्याने काही त्रुटी राहिल्या आहेत. दोषींवर कारवाई केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी सभागृहाला दिले. त्यानंतर अहवाल मंजूर केला.

विद्यापीठाची अधिसभा बैठक शुक्रवारी पार पडली. ताळेबंद अहवालावर लेखापरीक्षकांनी गंभीर ताशेरे ओढले आहेत, यावर अधिसभा सदस्य संजय परमणे, रतन कांबळे, अभिषेक मिठारी, डॉ. प्रकाश कुंभार यांच्यासह इतर सदस्यांनी लक्ष वेधले. लेखापरीक्षकाने नोंदवलेल्या ६६ कोटींच्या शेऱ्यावर डॉ. प्रकाश कुंभार यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. त्यामुळे ताळेबंदमधील त्रुटींवर दोन तास वादळी चर्चा झाली. भविष्यात अशा प्रकारचा ताळेबंद न करता चुकांची दुरुस्ती करूनच सभागृहासमोर मांडण्याच्या सूचनाही केल्या. लेखापरीक्षकाच्या शेऱ्यामुळे सर्व त्रुटी सभागृहासमोर आल्याचे अभिषेक मिठारी यांनी सांगितले.

### ताशेरे असे..

- राजीव गांधी फेलोशिपची रक्कम विद्यार्थ्यांना द्या अन्यथा फंडिंग एजन्सीला पाठवा.
- वित्त व लेखाधिकारी कार्यालयासह सर्व अधिविभागांनाही ताळेबंदमधील त्रुटींसाठी दोषी धरून कारवाई करावी.
- एआरसी नसलेल्या कंपन्यांकडून ज्यादा पैशात खरेदी का केली.?
- अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकाने प्रकल्पासाठी पूरक पुस्तक खरेदी न करता इतर पुस्तक खरेदी केली.
- मानसशास्त्र शाखा विभागाने तयार केलेल्या सॉफ्टवेअरला मंजुरी का घेतली नाही, यासह अन्य त्रुटी सदस्यांनी सभागृहासमोर आणल्या.

### पाच प्रश्नांवरच संपला प्रश्नोत्तराचा तास



अभिषेक मिठारी यांनी विद्यापीठातील अधिविभागांमधील विद्यार्थी संख्येत घट का होतेय. टी-२ विभागांत प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी तक्रारींची संख्या किती? असे प्रश्न उपस्थित केले तर श्वेता परुळेकर यांनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धांना जाणाऱ्या खेळाडूंचे तिकीट दोन दिवस आदी कन्फर्म करावे. खेळाडूंच्या ट्रॅकसूटचा बदलेला रंग, खेळाडूंना त्वरित सहभागी प्रमाणपत्र मिळावे यासंदर्भात प्रश्नांची सरबत्ती केली. प्रशासनाच्या उत्तराने सदस्यांचे समाधान झाले नसल्याने प्रचंड गोंधळात पाचच प्रश्नावर प्रश्नोत्तराचा तास संपला.

### बैठकीत १७ ठराव मंजूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक शुक्रवारी रात्री १०.१५ वाजेपर्यंत सव्वाबारा तास चालली. बैठकीत ७७ ठरावांवर चर्चा होऊन त्यापैकी १७ ठराव मान्य करण्यात आले. ५९ ठराव मागे घेण्यात आले, तर एक ठराव बहुमताने मागे घेण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2024
लोकसत्ता

# कोल्हापुरातील सहकार, शिक्षणाचे डॉ. मनमोहन सिंग यांना आकर्षण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : सहकार, शिक्षण, ग्रामीण विकास आदी विविध कारणांनी कोल्हापूरला भेट दिलेले डॉ. मनमोहन सिंग हे त्यांच्या विनम्र स्वभावामुळे स्मरणात राहिले. कोल्हापूर जिल्ह्याने सहकारात केलेल्या कार्याने ते प्रभावित झाले होते.

१९९३ साली ह्यफाय फाउंडेशनह्व पुरस्कार कार्यक्रमाला डॉ. सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते जब्बार पटेल आदींना पुरस्कार प्रदान करण्यात आला. फाय उद्योग समूह आणि त्यांच्या प्रतिष्ठा लाभलेल्या पुरस्काराचे डॉ. सिंग यांनी कौतुक केले होते, असे नियोजन समितीतील डॉ. श्रीवल्लभ मर्दा यांनी सांगितले.

सहकाराचा गौरव

त्यानंतर केंद्रीय वित्त मंत्री डॉ. सिंग यांनी इचलकरंजीतील विणकर समाजाने बांधलेल्या श्री चौंडेश्वरी सहकारी बँकेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन केले. त्यावेळी ही इमारत गावातील अन्य




डॉ. मनमोहन सिंग यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात मार्गदर्शन केले.

बँकांच्या मानाने टुमदार, प्रशस्त, आधुनिक स्थापत्य शैलीची अशी होती. त्याचे डॉ. सिंग यांनी कौतुक करून सहकाराच्या माध्यमातून परिसरात वस्त्रोद्योग वाढीस लागल्याबद्दल आनंद व्यक्त केला होता, अशी आठवण बँकेचे तत्कालीन अध्यक्ष विठ्ठलराव डाके यांनी कथन केली.

विद्यार्थ्यांना कवाडे खुली

पुढील वर्षी डॉ. मनमोहन सिंग यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला उपस्थिती लावली होती. त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान केला होता. समारंभात डॉ. सिंग यांनी जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण या धोरणामुळे भारताची आर्थिक प्रगती झाली आहे. यामुळे देशभर व्यापक संधीची कवाडे उपलब्ध झाली असून त्याचा नवपदवीधरांनी लाभ घेण्याचे आवाहन केले होते.

बंध ग्रामविकासाशी

२०१० साली राज्याचे ग्रामविकास राज्यमंत्री सतेज पाटील यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांची पंतप्रधान कार्यालय खात्याचे राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या माध्यमातून भेट घेतली होती. तेव्हा ग्रामीण भागातील अर्थकारण वाढीस लागण्यासाठी आपण मांडलेल्या संकल्पनांना सहकार्य करण्याची भूमिका घेत पुढे या विभागाला चांगले अर्थसहाय्य केले, असे सतेज पाटील यांनी नमूद केले. डॉ. सिंग यांच्या निधनानंतर त्यांच्या कोल्हापूर भेटीविषयी आठवणींना असा उजाळा मिळत राहिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2024
सकाळ

# शहाजी महाविद्यालयात भित्तिपत्रकाचे अनावरण

**कोल्हापूर :** श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात श्रीपतराव बोंद्रे, विजयराव बोंद्रे यांच्या जयंती महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विभागातर्फे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या विश्लेषणाचा मागोवा घेणाऱ्या भित्तिपत्रकाचे अनावरण केले. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. आर. डी. मांडणीकर आदींच्या उपस्थितीत भित्तिपत्रकाचे अनावरण झाले. विधानसभा निवडणुकांतील ओपिनियन, एक्झिटपोल, निवडणुकांमधील घराणेशाही, लाडकी बहीण, महाराष्ट्र विधिमंडळातील २१ महिलांचा सहभाग, निवडणुकांमधील अपक्ष आमदारांची स्थिती, १९९५ ते २०२४ पर्यंतच्या निवडणुकांची आकडेवारीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी भित्तिपत्रके सादर केली. डॉ. विजय देठे यांनी आभार मानले. शिवाजी ग्रंथालयातर्फे ग्रंथ प्रदर्शन झाले. ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल यू. यू. साळोखे यांनी आभार मानले. मंजिरी भोसले, अर्पणा गावडे, सुहास टिपुगडे, बाळासाहेब इंगवले, विजय लाड, दीपक गुरव, अतुल कांबळे यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2024

पुढारी

# आविष्कार संशोधन स्पर्धेत न्यू कॉलेजचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये न्यू कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. ॲग्रीकल्चर विभागातून विघ्नेश पाटीलने प्रथम क्रमांक पटकावला. इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी विभागातून दीक्षा घोसरवाडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. कॉमर्स आणि मॅनेजमेंट विभागातून श्रावणी गुरवने द्वितीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचा शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुनीलकुमार लवटे, श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील व प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक विनय पाटील, आविष्कार समिती प्रमुख डॉ. अर्चना कांबळे, प्रा. सरोज देशमुख व प्रबंधक एम. वाय. कांबळे उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2024
सकाळ

# सानिका दाडमोडेची विद्यापीठ संघात निवड



सानिका दाडमोडे

इचलकरंजी : श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाची खेळाडू सानिका दाडमोडे हिची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली. या स्पर्धा बनस्वरा (राजस्थान) येथे होणार आहेत. तिला प्राचार्य डॉ. बाबासाहेब दुधाळे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सविता भोसले आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2024
पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठांतर्गत नेटबॉल स्पर्धेत मायणी, कराड संघाला विजेतपद

**मायणी : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व मायणी येथील कला व वाणिज्य महाविद्यालय, यांच्या वतीने सातारा विभागीय नेटबॉल (पुरुष व महिला) स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत पुरुष गटात कला-वाणिज्य महाविद्यालय या यजमान महाविद्यालयाने तर महिला गटात कराडच्यां शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने विजेतपद मिळवले.

या स्पर्धेत नऊ संघांनी सहभाग नोंदवला. पुरुष गटात शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड यांनी द्वितीय, तर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड यांनी तृतीय क्रमांक मिळवला. तर महिला गटात सद्गुरू गाडगेबाबा महाराज महाविद्यालय, कराड यांनी द्वितीय, तर महिला महाविद्यालय, कराड यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

स्पर्धेचे उद्घाटन मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गुदगे यांच्या हस्ते झाले. खेळाडूंनी खिलाडूवृत्ती जोपासून प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी उपस्थितांचे स्वागत प्रा. शिवशंकर माळी यांनी केले. प्राचार्य डॉ. गोरोबा खुरपे यांनी स्पर्धा आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. आभार क्रीडा संचालक प्रा. सम्राट शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी केले. यावेळी सातारा क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. माणिक गोरवे व प्रा. हृषीकेश इनामदार, दिगंबर पिटके, प्रशांत सणगर, प्रा. गुणकी, प्रा. विद्या पाटील, प्रा. स्मिता जगताप, प्रा. देवदत्त महात्मे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्रातील १२३ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील



अभ्यासक्रमांचे आजअखेर १२३ निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बीए, बी.कॉम, बी.एसएस्सी, एमए, एम.कॉम, एम.एस्सी, बीबीए, बीसीए, बीए बी.एड्., एलएलबी, बीएसडब्ल्यू, एम.एड्. आदी २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १७४ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला १७ हजार ८०८ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. २७ रोजी बीसीए, बी.एस्सी. (पर्यावरणशास्त्र), बीए बी.एड्. विविध सत्राच्या १५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. भरारी पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून (०२), सांगली (११) अशा १३ गैरप्रकारांची नोंद झाली असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 DEC 2024
तरुण भारत

# वासंतीदेवी पाटील फार्मसीला विद्यापीठामार्फत अनुदान

**वारणानगर :** कोडोली (ता. पन्हाळा) येथील श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला शिवाजी विद्यापीठामार्फत १ लाख २५ हजार रुपयाचे अनुदान मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेल्या डायमंड ज्युबली रिसर्च ग्रँट कॉलेज टीचर्स स्कीम यातून हे अनुदान मिळाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी या योजनेमध्ये संशोधन प्रकल्प हाती घेण्यासाठी पात्र शिक्षकांनी प्रस्ताव विद्यापीठात विद्यापीठ विकास विभागात प्रा. ललिता दहिवडे यांनी दाखल केला होता. त्यातून महाविद्यालयाला १ लाख २५ हजारची रक्कम बहाल करण्यात आली. यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. जयंत पाटील व विश्वस्त विनिता पाटील यांचे प्रोत्साहन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. एस. मंजप्पा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तर कार्यालयीन अधीक्षक वैशाली पवार यांचे सहकार्य लाभले.